लोकमत

# देवगड येथील स. ह. केळकर महाविद्यालयाचा मुंबई विद्यापीठातील युवा महोत्सवात सन्मान

## मुंबई विद्यापीठाच्या युवा महोत्सवातील नृत्य विभागाची 'ओव्हरऑल चॅम्पियनशिप'

लोकमत न्यूज नेटवर्क



मुंबई विद्यापीठाच्या युवा महोत्सवात केळकर महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. श्रीकांत सिरसाठे, सांस्कृतिक समन्वयक डॉ. नितीन वळंजू, विद्यार्थी साहिल जाधव यांनी सन्मान स्वीकारला.

**देवगड :** मुंबई विद्यापीठाच्या ५८ व्या युवा महोत्सवात नृत्य या कलाप्रकारात उल्लेखनीय कामगिरी करत लोकनृत्य प्रकारात सुवर्णपदक मिळवून 'ओव्हरऑल चॅम्पियनशिप'चा मान पटकावणाऱ्या देवगड येथील श्री. स. ह. केळकर महाविद्यालयाचा मुंबई विद्यापीठात सोमवारी, दि. २४ ऑगस्ट रोजी सन्मान करण्यात आला.

**२४** ऑगस्ट रोजी सन्मान करण्यात आला.

मुंबई विद्यापीठाच्या ग्रीन टेक्नॉलॉजी ऑडिटोरियममध्ये आयोजित या कार्यक्रमात बॉलीवूड अभिनेते बोमन इराणी आणि मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. रवींद्र कुलकर्णी यांच्या हस्ते गौरविण्यात आले. या गौरव सोहळ्याप्रसंगी केळकर महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. श्रीकांत सिरसाठे, सिंधुदुर्ग जिल्हा सांस्कृतिक सहसमन्वयक डॉ. नितीन वळंजू तसेच विद्यार्थी साहिल जाधव उपस्थित होते. या कार्यक्रमात सिंधुदुर्ग जिल्हास्तरीय युवा महोत्सवाचे उत्कृष्ट आयोजन केल्याबद्दल केळकर महाविद्यालयाचे सांस्कृतिक समन्वयक डॉ. नितीन वळंजू यांचा विशेष सन्मान करण्यात आला. केळकर महाविद्यालयाने युवा महोत्सवाच्या माध्यमातून सांस्कृतिक क्षेत्रात सातत्याने उल्लेखनीय कामगिरी केली असून, लोकनृत्यातील सुवर्णपदकासह मिळवलेली 'ओव्हरऑल चॅम्पियनशिप' ही महाविद्यालयाच्या सांस्कृतिक विभागाच्या उत्कृष्ट कार्याची पावती आहे. यशाबद्दल शिक्षण विकास मंडळ, देवगडचे सर्व पदाधिकारी, महाविद्यालयाचे प्राचार्य, उपप्राचार्य, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी तसेच विद्यार्थ्यांनी अभिनंदन केले आहे.